# संजीवन मध्ये राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांना आदरांजली –

**पन्हाळा प्रतिनिधी :** सोमवार पेठ (ता. पन्हाळा) येथील संजीवन अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये आज दि. २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेला कॉलेजचे प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व प्रतिमा पूजन करून आदरांजली वाहण्यात आली. भारतीय क्रीडाक्षेत्राचे नाव जगाच्या नकाशावर नेणारे दिग्गज हॉकीपटू मेजर ध्यानचंद यांचा जन्म दिवस हा राष्ट्रीय क्रीडा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. मेजर ध्यानचंद यांचा जन्म प्रयाग (इलाहाबाद) येथे २९ ऑगस्ट १९०५ रोजी झाला होता. १९२२ मध्ये ध्यानचंद सिंग सैन्यदलात भरती झाले. त्यानंतर त्यांनी हॉकीमध्ये इतिहास घडवला.

कार्यक्रमामध्ये आपल्या मनोगतात प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी यांनी सांगितले की, कॉलेज जीवनात अभ्यासाबरोबर खेळ हि तितकेच महत्वाचे आहेत. खेळामध्ये टीम वर्कला खूप महत्व आहे. आपले संजीवन कॉलेज इतर गोष्टीबरोबर खेळातही नेहमी अग्रेसर असते याचा मला अभिमान आहे. त्याचबरोबर सध्या जकार्ता मध्ये चालू असलेल्या एशियन गेम्स स्पर्धेत भारताने ९ सुवर्ण पदकासह एकूण ५० पदकांची लयलूट केली आहे. त्या सर्व खेळांडूचे कॉलेज प्रशासनामार्फत अभिनंदन. कार्यक्रमात स्पोर्ट विभागाचा विद्यार्थी प्रतिनिधी अंकुश संगिनकर यांने मेजर ध्यानचंद यांचा जीवनपट उलगडून सांगितला.

राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून कॉलेजमधील शिक्षक व शिक्षक्केत्तर कर्मचारी यांच्या क ॅरम व बुद्धिबळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक आणि क्रिडा शिक्षक प्रा. रणजीत इंगवले व राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडील सर्व विद्यार्थी यांनी केले होते. कार्यक्रमास कॉलेजचे प्रभारी प्राचार्य डॉ. एस. एल. घोडके, सर्व विभागप्रमुख, शिक्षक, शिक्षक्केत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन सिद्धराज कदम याने केले, तर आभार सौरभ भोसले यांने मानले. संजीवन संस्थेचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले यांचे या कार्यक्रमास विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

**फोटो ओळ :**

**पन्हाळा :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांना आदरांजली वाहताना प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी, प्रा. डॉ. एस. एल. घोडके, प्रा. रणजीत इंगवले व विद्यार्थी.

**- संग्राम पाटील, सहाय्यक ग्रंथपाल, सेटी, पन्हाळा**



NATIONAL SPORTS
DAY 29/08/2018


NATIONAL SPORTS
DAY


NATIONAL SPORTS
DAY




**पन्हाळा :** राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त मेजर ध्यानचंद यांना आदरांजली वाहताना प्राचार्य डॉ. मोहन वनरोट्टी, प्रा. डॉ. एस. एल. घोडके, प्रा. रणजीत इंगवले व विद्यार्थी.